महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड

दुरध्वनी क्रमांक: 02462-244474, 234255 फॅक्स क्रं 02462-235103
E mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com
पीआरओ तळमजला खोली क्रमांक -17
पोलीस अधीक्षक कार्यालय वजिराबाद, नांदेड-431601

**PRESS NOTE** दिनांक 12.09.2025.

## " वजिराबाद पोलीसांनी 10 अवैध गोवंश जनावरांची वाहतूक करणारे वाहनांवर कारवाई करुन एकुण 8,00,000 /- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त "

| पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | फिर्यादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| वजिराबाद | गु.र.नं. 389/2025 कलम 5,5(1),9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976, कलम 11(1),(डी),(इ) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम सह कलम 83,177 मोवाका | सपोनि/राजु वटाने पो. स्टे. वजिराबाद |
| माहिती कशी प्राप्त झाली | गुन्हा दाखल तारीख | गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण |
| गोपनीय | दिनांक 12/09/2025 रोजी 06.35 वा. | दिनांक 12/09/2025 रोजी 02.05 वाजता हस्सापूर रोडवर नांदेड |

### गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार

मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड
मा. श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड
श्रीमती. अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर
मा. श्री. रामेश्वर वेंजने,उपविभागीय पोलीस अधिकारी, नांदेड शहर
यांचे मार्गदर्शनाखाली
श्री. परमेश्वर कदम, पोलीस निरीक्षक, ने पो. स्टे. वजिराबाद, नांदेड
सपोनि/राजु वटाने, प्रोपोउपनि/बुलंगे,पोहेकॉ/सोनटक्के,नंदे,एमेकर
ने. पो. स्टे. वजिराबाद नांदेड

### आरोपीचे नाव व पत्ता

1.शेख शोहेल शेख रफिक वय 23 वर्षे 2. नसीर बशीर कुरेशी वय 31 वर्षे, 3.मिरसाब अब्दुल शेख वय 31 वर्षे, तिघे रा.खुदबेनगर नांदेड 4.सरवर गौस मोहमद कुरेशी वय 37 वर्षे,रा.हिलालनगर नांदेड 5.रिजवान कुरेशी रा.नांदेड 6.उमर कुरेशी रा.परभणी

| जप्त मुद्देमाल | 10 गोवंश जातीचे जनावरे व दोन बोलेरो पिकअप वाहने असा एकुण किंमती 8,00,000/- रुपये |
|---|---|

### गुन्ह्याची हकीकत

मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी गुन्हेगारांना आळा घालण्याचे पार्श्वभुमीवर अवैध जनावरे वाहतुक करणारे व्यक्ती विरुध्द कारवाई करणे बाबत सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने दिनांक 12/09/2025 रोजी यातील अधिकारी व कर्मचारी हे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहिती वरुन वरील अधिकारी व कर्मचारी यांनी हस्सापूर रोडवर दोन पिकअप वाहने क्रमांक एमएच/22 एएन-4342,एमएच/04 जेयु-8766 या वाहनास थांबवून पाहणी केली असता सदर वाहनामध्ये 10 गोवंशीय जातीचे जनावरे अवैधरित्या वाहतूक करीत जनावरे दाटीवाटीने कोंबुन निर्दयीपणे बांधलेले असताना मिळून आल्याने नमुद आरोपीतां विरूध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम व मोटार वाहन कायदया अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मा.श्री.अबिनाश कुमार पोलीस अधीक्षक नांदेड यांनी अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड